Toppersnotes®
Unleash the topper in you

# MPSC

## राज्यसेवा पूर्व एवं मुख्य परीक्षा

## महाराष्ट्र लोक सेवा आयोग

### सामान्य अध्ययन

पेपर 4 – भाग – 1

# अर्थव्यवस्था व नियोजन

SIERRA INNOVATIONS

# Maharastra - PSC

## अर्थव्यवस्था व नियोजन


| क्र.सं. | अध्याय | पृष्ठ सं. |
|---|---|---|
| 1. | अर्थशास्त्राच्या मूल संकल्पना | 1 |
| 2. | राष्ट्रीय उत्पन्न | 5 |
| 3. | राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्वती | 9 |
| 4. | व्यवसायाची चक्रे | 13 |
| 5. | बेरोजगारी | 16 |
| 6. | आर्थिक विकासाचे निर्देशांक | 20 |
| 7. | आर्थिक विकासाचे घत्क | 24 |
| 8. | लोकसंख्या शास्त्रीय सक्रमण सिद्धान्त | 27 |
| 9. | लिंग अंतर | 31 |
| 10. | सर्वसमविशक विकास | 34 |
| 11. | दारिद्वय | 37 |
| 12. | सामाजिक सुरक्षा व सामाजिक कायदे | 41 |
| 13. | भारतातील सामाजिक सुरक्षचे उपाय | 45 |
| 14. | सार्वजनिक वित्त | 48 |
| 15. | राजकोषीय धोरण | 52 |
| 16. | अर्थसंकल्प | 55 |
| 17. | सार्वजनिक धोरण, नियोजन, अंमलबजावणी, मुल्यमापन, विश्लषण | 59 |
| 18. | पैसा | 63 |
| 19. | चलनवाद | 67 |
| 20. | आंतरराष्ट्रीय नाणेनिधी | 71 |
| 21. | आशियाई विकास बैंक | 75 |
| 22. | प्रादेशिक व्यापारी करार | 78 |
| 23. | बौद्धीक संपदा अधिकाराचे व्यापार संबंधित पैलू | 82 |
| 24. | प्रादेशिक असमानता | 86 |
| 25. | पंचवाषिक योजना | 89 |
| 26. | सातवी पंचवार्षिक योजना | 92 |

| | | |
|---|---|---|
| 27. | अर्थिक सुधारणा | **95** |
| 28. | आर्थिक विकासात शेतीची भूमिका | **98** |
| 29. | शेतीच प्रकार | **119** |
| 30. | अचुक शेती | **123** |
| 31. | हरितक्रांती | **126** |
| 32. | सार्वजनिक वितरण प्रणाली | **130** |
| 33. | राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बैक | **134** |
| 34. | मौद्रिक व वित्तीय क्षेत्र | **137** |
| 35. | भांडवल आणि मुद्रा बाजार | **149** |
| 36. | परकीय भांडवल व तंत्रज्ञान (भारताच्या विकासात योगदान) | **152** |
| 37. | रिझर्व बैक ऑफ इंडिया | **156** |
| 38. | भारतीय सिक्युरिटीस एंड एक्सचेंज बोर्ड | **160** |
| 39. | सहकार | **163** |
| 40. | उद्योग व सेवा क्षेत्र | **167** |
| 41. | पायाभूत सुविधा विकास | **181** |
| 42. | ग्रामीण पायाभूत सुविधा | **189** |
| 43. | विकास आणि पर्यावरण | **192** |


# प्रिय विद्यार्थी, टॉपर्सनोट्स चुनने के लिए धन्यवाद।

## नोट्स में दिए गए QR कोड्स को स्कैन करने लिए टॉपर्स नोट्स ऐप डाउनलोड करे।


ऐप डाउनलोड करने के लिए दिशा निर्देश देखे :-

**ऐप इनस्टॉल करने के लिए आप अपने मोबाइल फ़ोन के कैमरा से या गूगल लेंस से QR स्कैन करें।**


**टॉपर्सनोट्स एग्जाम प्रिपरेशन ऐप**




**टॉपर्सनोट्स ऐप** डाउनलोड करें गूगल प्ले स्टोर से।





लॉग इन करने के लिए अपना **मोबाइल नंबर** दर्ज करें।




अपनी **परीक्षा श्रेणी** चुनें।




**सर्च बटन पर** क्लिक करें।




**SCAN QR पर** क्लिक करें।





किताब के **QR कोड को स्कैन** करें।




- सोल्युशन वीडियो
- डाउट वीडियो
- कॉन्सेप्ट वीडियो




- अतिरिक्त पाठ्य-सामग्री




- विषयवार अभ्यास
- कमजोर टॉपिक विश्लेषण




- रैंक प्रेडिक्टर
- टेस्ट प्रैक्टिस

किसी भी तकनीकी सहायता के लिए **hello@toppersnotes.com** पर मेल करें या **766 56 41 122** पर whatsapp करें।

Toppersnotes
Unleash the topper in you

# अर्थशास्त्राच्या मूल संकल्पना

① **अर्थशास्त्र** :- हे एक सामाजिक विज्ञान आहे जे वस्तु आणि सेवा यांचे उत्पादन, वितरण, वापर इ. विश्लेषण करते. त्याद्वारे मानवी क्रियाकल्पाचा अभ्यास करता येईल.

गरजा पूर्ण करण्यासाठी यात उत्पादन वितरण, व्यापार, उपभोग यांचा समावेश.

* **अर्थशास्त्राच्या प्रमुख दोन शाखा** :-

① **सुक्ष्म अर्थशास्त्र** :- टंचाईच्या (Micro-Economics) परिस्थितीत निर्णय कसे घेतले जातात हे समजून घेण्यासाठी ग्राहक, व्यवसाय, घर, इ. वैयक्तिक तथा सुक्ष्म पातळीवर निरिक्षण करतात.

② **समग्रलक्षी अर्थशास्त्र** :- ह्यामध्ये (Macro-economics) अर्थव्यवस्थेचा व त्यातील घटक जसे रोजगार, गरिबी, महागाई यांचा व्यापक प्रमाणात अभ्यास व निरिक्षण करते.

* **फरक**.

| सुक्ष्म अर्थशास्त्र | समग्रलक्षी अर्थशास्त्र |
|---|---|
| → लियोन वालरस व्दारा सकल्पित | → जे एम केन्स व्दारा संकल्पित |
| → वैयक्तिक उत्पन्नाचा अभ्यास. | → राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास |
| → कामगाराची मागणी व पुरवठा. | → अर्थव्यवस्थेतील उपलब्ध पूर्ण श्रमाचा अभ्यास. |
| → घरघुती तसेच कंपन्या चे निर्णय. | → एकत्रित निर्णयाचा अभ्यास. |
| → वैयक्तिक किंमतीचा अभ्यास. | → अर्थव्यवस्थेतील समग्र किंमतीचा अभ्यास. |
| → वस्तुची मागणी व पुरवठा यांचे विश्लेषण. | → एकूण मागणी व पुरवठा यांचे विश्लेषण |

* समग्रलक्षी अर्थशास्त्र.
→ अर्थव्यवस्थेची अशी शाखा जी संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करते.
→ ही राष्ट्रीय किंवा प्रादेशिक स्तरावरील अर्थव्यवस्थेची कामगिरी, रचना, वर्तन याच्याशी संबंधित.
→ संपूर्ण अर्थव्यवस्था कशी काम करते हे समजून घेण्यासाठी GDP, बेरोजगारी किंमत दर इ. मागोवा घेते.

* अर्थव्यवस्थेचे प्रकार.
① भांडवली अर्थव्यवस्था
→ इथे उत्पादनाची साधने व्यक्ती किंवा संस्थांच्या मालकीची असतात.
→ नफा कमावणे हा प्रमुख उद्देश.
→ उत्पादन, वितरण, उपभोग, याबाबत निर्णय हे सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय, मागणी व पुरवठ्यावर आधारित केले जातात.
→ उदा. - अमेरिका, कॅनडा, जर्मनी इ.

② समाजवादी अर्थव्यवस्था.
→ राज्य अर्थव्यवस्था ज्यामध्ये उत्पादनाची साधने राज्याच्या मालकीची व नियंत्रित असतात.
→ यात उत्पादन, वितरण, उपभोग याबाबत राज्य महत्त्वाची भूमिका निभावते.
→ उदा. - डेन्मार्क, स्वीडन, फिनलॅंड इ.

③ मिश्र अर्थव्यवस्था.
→ यामध्ये भांडवली तसेच समाजवादी अर्थव्यवस्थेचा अंश.
→ येथे उत्पादनाची साधने राज्य व खाजगी या दोघांच्या मालकीची व नियंत्रित असतात.
→ उत्पादन, वितरण, उपभोग याबाबत राज्य व खाजगी दोन्ही महत्त्वाची भूमिका निभावतात.
→ उदा. - भारत, ऑस्ट्रेलिया, जपान इ.

* अर्थव्यवस्थेची क्षेत्रे -

① प्राथमिक क्षेत्र.
→ कृषी क्षेत्र म्हणुनही ओळखले जाते.
→ ज्यामध्ये जमीन, पाणी, वनस्पती, खनिजे यांचे वापर समाविष्ट आहे.
→ यामध्ये शिकार करणे, पशुपालन, मासेमारी, खाणकाम, उत्खनन यांचा समावेश.

→ सकल राष्ट्रीय उत्पादनात प्राथमिक क्षेत्राचे प्रमाण जवळपास 21% आहे. (ज्यात शेती व पुरक उद्योग याचे प्रमाण 20% आहे) → यात काम करणारे रेड कॉलर लोक.

② द्वितीय क्षेत्रे.
→ उत्पादन क्षेत्रे म्हणून ओळख ज्यात नैसर्गिक संसाधनाचे मुल्य वाढवले जाते.
→ कच्च्या मालाचे ~~रूपांतर~~ मौल्यवान उत्पादनात रूपांतर
→ दुय्यम कार्यात गुंतलेल्या लोकांना ब्ल्यु कॉलर कामगार म्हणतात.
→ सकल राष्ट्रीय उत्पादनात दुय्यम क्षेत्राचा वाटा 24% आहे.

③ सेवा क्षेत्र.
→ यात उत्पादन व विनिमय दोन्हीचा समावेश.
→ उत्पादनात विनिमय व्यापार, वाहतूक, दळणवळण, इ. समावेश.

→ यात काम करणाऱ्या कामगारांना व्हाईट कॉलर कामगार म्हणतात.
→ सकल राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा जवळपास 55% इतका आहे.

④ चतुर्थाक क्रियाकलाप.

→ ज्ञान क्षेत्र.

→ कार्यालयीन इमारती, प्राथमिक शाळा डॉक्टरांची कार्यालये यां हे स्वतंत्र वर्गीकरणाची मागणी करतात.

⑤ क्विनरी क्रियाकलाप.

→ ज्या सेवा नविन, विद्यमान कल्पनांची निर्मिती, पूर्नरचना, इ. लक्ष केंद्रीत करतात.

→ यात काम करणारे गोल्ड कॉलर प्रोफेशन्स म्हणवले जातात.

→ यामध्ये संशोधन शास्त्रज्ञ, आर्थिक व कायदेशीर सल्लागार इ समावेश.

# राष्ट्रीय उत्पन्न

→ राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे विशिष्ट वर्षात देशाद्वारे उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तु व सेवांचे एकुण मुल्य आहे.

→ यात होणाऱ्या वाढीमुळे देशाची प्रगती कळुन येते.

→ दुसऱ्या शब्दात, एका वर्षाच्या कालावधीत आर्थिक क्रियाकलापांमधुन मिळणाऱ्या एकुण उत्पन्नाला राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात.

→ त्यात वेतन, व्याज, भाडे, नफा या स्वरूपात संसाधनांना दिलेली देयके समाविष्ट होतात.

→ राष्ट्रीय उत्पन्न :- $C + I + G + (X - M)$

C − एकुण उपभोग खर्च
I − एकुण गुंतवणुक खर्च
G − एकुण सरकारी खर्च
X−M − ~~[illegible]~~ निर्यात − आयात

→ राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रकार

① स्थुल देशांतर्गत उत्पाद :- GDP

→ यातील महत्त्वाचा शब्द - देशांतर्गत.

→ दिलेल्या कालावधीत देशाच्या हद्दीत उत्पादित झालेल्या सर्व अंतिम वस्तु व सेवांचे एकुण मुल्य.

→ या प्रकरणात निवासी नागरिकांचे तसेच त्या भौगोलिक भागातील परदेशी नागरिकांचे अंतिम उत्पादन गृहित धरतात.

→ याचे मुख्यत्व दोन प्रकार

A] वास्तविक GDP :- मुळ वर्षाच्या किमतीवर आधारभुत वस्तु व सेवांचे अंतिम मुल्य

B] नाममात्र (मौद्रिक) GDP :- चालु वर्षाच्या किमतीवर आधारित वस्तु व सेवांचे अंतिम मुल्य.

या दोहोंमध्ये वास्तविक GDP हा सरस ठरतो, कारण नाममात्र GDP मध्ये तत्कालीन परिस्थिती पुरक (मौद्रिक) असु किंवा नसु शकते.

Toppersnotes
Unleash the topper in you

2] स्थुल राष्ट्रीय उत्पाद - [GNP]

→ येथे महत्वाचा शब्द - 'राष्ट्रीय'

→ GNP हे दिलेल्या कालावधीत देशाच्या नागरिकांनी उत्पादित केलेल्या वस्तु व सेवाचे अंतिम मुल्य.

→ या प्रकरणात देशातील निवासी व अनिवासी नागरिकाचे उत्पन्न समाविष्ट.

→ भारतातील परदेशी नागरिकांचे उत्पन्न वगळण्यात येते.

→ याच्या अर्थ असा, GNP मध्ये फक्त भारतीय नागरिक (मग ते निवासी असो वा अनिवासी) त्यांचे उत्पन्न ग्राह्य धरले जाते.

A] बाजार मुल्य :- वास्तविक व्यवहार केलेल्या किंमतीचा संदर्भ देतो. ज्यामध्ये कस्टम ड्युटी, अबकारी कर, सेवा कर इ. समावेश होतो.

B] घटक मुल्य :- यामध्ये उत्पादनासाठि लागणारे घटक म्हणजे जमिनीचे भाडे, कामगाराचे वेतन, उद्योजकाचा नफा इ. समावेश होतो. बाजारमुल्यापेक्षा घटक मुल्य कमी

महसुल किंमत = बाजार मुल्य - निव्वळ अप्रत्यक्ष कर

निव्वळ अप्रत्यक्ष कर = अप्रत्यक्ष कर - अनुदाने

म्हणुन
घटक मुल्य = बाजार मुल्य - अप्रत्यक्ष कर + अनुदाने

3] निव्वळ राष्ट्रीय उत्पाद - (NNP)

→ GNP - Depreciation (घसारा).

→ ही वजावट करण्यामागे कारण सध्याच्या उत्पादनाचा एक भाग आधीपासून उत्पादित केलेल्या उत्पादनाच्या घसरलेल्या भागाशी जातो :

4] निव्वळ देशांतर्गत उत्पाद - NDP

→ NDP = GDP - घसारा.

→ NDP अर्थव्यवस्था हे नेहमी तिच्या GDP पेक्षा कमी असते कारण तिचे अवमुल्यन शुन्यावर करता येत नाही.

→ NDP & NNP या संकल्पना वेगवेगळ्या अर्थव्यवस्थांची तुलना करण्यासाठी वापरतात.

घटक मुल्यावर आधारित राष्ट्रीय उत्पन्न

→ ही देशातील रहिवाशांनी देशातून तसेच परदेशातून कमावलेल्या घटकांची बेरीज.

FCNI = NNP (बाजारमुल्य) - अप्रत्यक्षकर + अनुदान

→ भारत व इतर विकसनशिल देशामध्ये राष्ट्रीय उत्पन्न बाजार मुल्यापेक्षा घटक खर्चावर मोजले जाते. त्याची कारणे -

- करात एकसमानता नसणे.
- वस्तुच्या किंमती एकसारख्या नसणे इ.

* हस्तांतरण देयके (Transfer payment)

→ ज्याच्या बदल्यात कोणतीही आर्थिक क्रियाकलाप केला जात नाही.

→ उदा. - वृध्दापकाळ निवृत्ती वेतन, शिष्यवृत्ती इ.

* वैयक्तिक उत्पन्न

→ देशातील सर्व व्यक्ती किंवा कुटुंबांना एकत्रित मिळालेल्या सर्व उत्पन्नाचा संदर्भ

Toppersnotes
Unleash the topper in you

→ यामध्ये पगार, वेतन, बोनस, इतर स्त्रोतांकडुन मिळणारे उत्पन्न इ समावेश. तसेच रोजगार वा स्वयंरोजगारातून मिळणारे उत्पन्न, गुंतवणुकीचा लाभांश, इ.

* डिस्पोजेबल वैयक्तिक उत्पन्न.

→ वैयक्तिक कर भरून व्यक्तीकडे राहणारे शिल्लक रक्कम आहे जी त्यांना त्यांच्या इच्छेनुसार खर्च करण्यासाठी उपलब्ध.

→ DPI = PI − कर (वैयक्तिक कर)

→ ही संकल्पना व्यक्तीच्या उपभोग व बचत वर्तनाच्या अभ्यास करण्यासाठी उपयोगी

* राष्ट्रीय उत्पन्नावर परिणाम करणारे घटक.

(1) उत्पादनाचे घटक :- संपन्न व कार्यक्षम घटक, तेवढे जास्त राष्ट्रीय उत्पन्न.

(2) जमीन :- नैसर्गिक संसाधने जसे कोळसा लोह इ. व त्यांचे भौगोलिक स्थान महत्वाचा भाग.

(3) भांडवल :- भांडवल हे गुंतवणुकीवर अवलंबुन. जी राजकीय स्थैर्य, नफा इ. अवलंबुन

(4) श्रम :- जेवढी श्रमाची गुणवत्ता व उत्पादकता चांगली तेवढी परिस्थिती अनुकूल.

(5) तंत्रज्ञान :- तंत्रज्ञान व संशोधन हा अविभाज्य घटक.

(6) राजकीय स्थैर्य.

Toppersnotes
Unleash the topper in you

## राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती

① उत्पन्न पद्धत :- उत्पादक घटकांना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न मोजले जाते.

→ यामध्ये घटक किंमत विचारात घेतली जाते.

→ राष्ट्रीय उत्पन्न = एकूण वेतन + एकूण खंड + एकूण व्याज + एकूण नफा.

- कर्मचाऱ्यांना भरपाई :- रोख व इतर प्रकारात दिलेले पगार व फायदे.
- स्थिर मालमत्ता :- यंत्रभागाची झीज व त्याचे नवीन भाग.
- उत्पादनावरील कर व अनुदान

② उत्पादन पद्धत :- या पद्धतीत राष्ट्रीय उत्पन्न हे उत्पादन संस्थाच्या मुल्यवर्धित याची बेरीज करून काढले जाते.

- यातून काढलेले राष्ट्रीय उत्पन्न बाजार मुल्यावर आधारित.
- ~~समाधये~~ उत्पादनात समाविष्ट होणाऱ्या
  - वस्तु व सेवा प्रत्यक्षात बाजारात विकल्या जातात त्या.
  - वस्तु व सेवा विकल्या जात नाहीत, परंतु मोफत पुरवल्या जातात.
- उत्पादनात समावेश नसणाऱ्या.
  - → सेकंड हॅण्ड वस्तु.
  - → बेकायदेशिर मार्गाने उत्पादित वस्तु.
  - → नैसर्गिक वस्तु जसे पाणी, हवा.
  - → हस्तांतरित देयके.

- राष्ट्रीय उत्पन्न = सकल किंमत वाढ + अप्रत्यक्ष कर - अनुदान

Toppersnotes
Unleash the topper in you

③ खर्च पद्धत :- अर्थव्यवस्थेतील सर्व्या उत्पादित अंतिम वस्तु व सेवावर होणारा खर्च मोजला जातो.
खर्च करणाऱ्या प्रमुख 3 संस्था-
— घरगुती
— कंपन्या
— सरकार
— हा खर्च 4 बाबींने बनलेला आहे.

① C — कुंटुबाद्वारे केलेला वैयक्तिक उपभोग खर्च.

② I — गुंतवणुक ही एका कालावधीत अर्थव्यवस्थेच्या भांडवली साठ्यात केलेली भर आहे.
यामध्ये कंपन्या व सरकारी गुंतवणुकीचा समावेश.

③ G — सरकारने खरेदी केलेल्या वस्तु व सेवाचे मुल्य समाविष्ट
पेंशन, शिष्यवृत्ती, बेरोजगारी इ. यामध्ये समाविष्ट नाहीत

④ X-M — आयात व निर्यात याच्यातुन मिळालेले निव्वळ राशी.

→ भारतात GDP मोजण्यासाठी उत्पन्न पद्धती व उत्पादन पद्धती दोहोचा वापर केला जातो.

* दरडोई उत्पन्न.
→ एकुण लोकसंख्येने राष्ट्रीय उत्पन्नाला भागले असता दरडोई उत्पन्न मिळते.

दरडोई उत्पन्न :- $\frac{\text{राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{देशाची लोकसंख्या}}$

→ पूर्वी मानवी विकास हा दरडोई उत्पन्नाच्या आधारे मोजला जाई.

→ दरडोई उत्पन्न जास्त तर मानवी विकास ही जास्त व त्याउलट.

* मानव विकास निर्देशांक (HDI)
→ मानवी विकासाच्या महत्त्वाच्या परिमाणा-मधील सरासरी उपलब्धींचा सारांश आहे
याचे घटक म्हणजे
— दिर्घ व निरोगी जीवन
— ज्ञानी असणे
— सभ्य जीवनमान

→ हा निर्देशांक महबूब उल हक व अमर्त्य सेन यांनी 1990 मध्ये विकसित केला. त्याचा वापर संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमात केला जातो.

→ 2010 नंतर या पद्धतीत थोडा बदल करून नवीन निर्देशांक तयार केला. जसे असमानता निर्देशांक, बहु आयामी गरिबी निर्देशांक इ.

→ "लोक ही राष्ट्राची खरी संपत्ती आहेत" ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्सची अहवालाची ही पहिली ओळ होती

* हरित GDP
→ ज्यामध्ये आर्थिक वाढीसोबत त्याच्या पर्यावरणीय परिणामाचा अभ्यास केला जातो.

→ उत्पादित वस्तु व सेवांच्या अंतिम मुल्यातून पर्यावरणीय ऱ्हासाची किंमत वजा केली जाते.

→ ऑस्ट्रेलिया, कॅनडा, मेक्सिको, इ. देशांनी या पद्धतीचा अवलंब केला आहे.

* सकल राष्ट्रीय आनंद
→ पैसा नव्हे तर आनंद महत्त्वाचा
→ जगातील इतर सर्व देश घसरत्या GDP आकड्यामुळे जितके दुःखी तितकाच भुतान हा छोटा देश आनंदी.

→ भुतानचे राजा जिग्मे सिंगे वांगचुक यांनी 1972 मध्ये ही संकल्पना मांडली

→ यामध्ये खालील घटकांचा समावेश
— उच्च वास्तविक दरडोई उत्पन्न
— सुशासन
— पर्यावरण संरक्षण

Toppersnotes
Unleash the topper in you

— सांस्कृतिक संवर्धन

* मानवी दारिद्र्य निर्देशांक

→ UN द्वारा विकसित

→ केवळ देशातील गरिबीच्या प्रमाणावर लक्ष केंद्रीत करते

→ दिर्घायुष्यातील वंचितता हे वयाच्या 40 वर्षापर्यंत न जगण्याच्या संभावतेवर मोजली जाते.

→ ज्ञानातील वंचितता प्रौढ लोक जे अशिक्षित आहेत त्यांच्या टक्केवारीद्वारे.

→ सभ्य राहणीमानाची वंचितता दोन प्रकारे मोजली जाते.

— सुधारित जलस्त्रोतापर्यंत शाश्वत प्रवेश नसणाऱ्या लोकांची टक्केवारी.

— कमी वजन असलेल्या 5 वर्षाखालील मुलांची टक्केवारी.

* वैश्विक किमान उत्पन्न (UBI)

→ किमान उत्पन्नाची हमी

→ प्रत्येकाने जगण्यासाठी पुरेसे कमावले आहे याची खात्री करण्याचा सोपा मार्ग त्यासाठी सरकार एक विशिष्ट रक्कम नियमित नागरिकांना प्रदान करते.

→ हे उत्पन्न सार्वत्रिक व बिनशर्त असेल. यासाठी कोणत्याही पात्रतेचा निकष नसेल.

* क्रयशक्ती

→ यामध्ये दोन चलन समतोल किंवा सममुल्य असतात.

→ जेव्हा वस्तुच्या बाजार टोपलीची (विनिमय दर लक्षात घेवून) समान किंमत असते

→ PPP च्या सापेक्ष आवृत्तीची गणना अशा सिद्धांताद्वारे केली जाते जो भिन्न चलनांची तुलना करतो.

# व्यवसायाची चक्रे

→ जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी अन्न, पोषण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा इ. मध्ये खर्च करणे आवश्यक, व त्यासाठी गुंतवणूक ही समान पातळीवर आवश्यक.

→ या संबंधी अनेक परिस्थिती असु शकतात जसे. स्थिरता, मंदी, पुर्नप्राप्ती

→ मंदी व तेजी यांच्यातील चढउतारांना अर्थशास्त्रतज्ञानी व्यवसाय चक्र म्हटले आहे

→ फ्रान्सचे अर्थतज्ञ क्लिमंट जगलर यांनी 1862 मध्ये यांची संकल्पना मांडली

→ प्रामुख्याने व्यवसायिक चक्राचे ५ भाग पडतात.

① <u>सुस्ती</u> (<u>Depression</u>) :-

→ अर्थव्यवस्थेतील अत्यंत कमी मागणीमुळे क्रियाकलाप मंदावतात.

→ बेरोजगारीचा दर वेगाने वाढतो.

→ बचत करण्यासाठी सक्तीची मजुर कपात केली जाते.

→ 1929 मध्ये जगाने ही स्थिती पाहिली.

② <u>मंदी</u> (<u>Recession</u>)

→ सुस्तीच्या नंतरचा व खोल टप्पा।

→ अर्थव्यवस्थेसाठी घातक

→ अमेरिकेत 2008 सालच्या सब-प्राईम क्राईसिस नंतर अनुभव

→ मागणित प्रचंड घट

→ रोजगारीचा दर खालावतो

→ पर्यायि व पूरक क्षेत्रात स्तब्धता येते

→ 1996-97 मध्ये भारतीय अर्थव्यवस्था मंदीच्या विळख्यात.

→ यातून बाहेर येण्याचे सर्वसाधारण उपाय.
- प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करात घट.
- वेतन व भत्त्यात वाढ.

③ पुर्नउत्थान (Recovery)

→ मंदीच्या विळख्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न.

→ मागणी व उत्पादनाला चालना देण्यासाठी सरकार नवीन उपाययोजना करते.

→ मागणीत वाढ ही महागाईला वर नेते. गुंतवणुकदारांना कर्ज घेणे सोपे होते.

→ यासाठी सरकार करात सुट देणे, व्याज कपात इ. उपाययोजना करून उद्योजकांना प्रोत्साहित करतात.

→ युरो-अमेरिकन अर्थव्यवस्था वरील नमुद उपायांच्या मदतीने महामंदीतून बाहेर पडल्या

④ तेजी (Boom)

→ अर्थव्यवस्था मंदीच्या तावडीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असताना सरकार व खाजगी संस्थाच्या उपाययोजना अर्थव्यवस्थेच्या पचनी पडत नाहीत.

→ यामुळे मागणीत अचानक सुमार वाढ.


→ बाजारपेठेत मागणी-पुरवठ्याचा मेळ दिसत नाही ज्यातुन महागाई वाढते

→ गुंतवणुक योग्य भांडवलाची कमतरता, राहणीमानाचा खालावलेला दर्जा, कमी बचत इ संरचनात्मक त्रूटी यात दिसून येतात.

→ पुर्नउत्थानाचा टप्पा तेजीपर्यंत पोहचेपर्यंत अर्थव्यवस्थेसाठी चांगला

→ तेजीनंतर सामान्यत: भाववाढ होते.

→ 1996-97 च्या दरम्यान महागाईचा दर हा महिन्याकाठी जवळजवळ 8% इतका होता. भारतात ही हीच परिस्थिती




* व्यवसायिक चक्र ही अर्थव्यवस्थेत येणारे चढउतार आहे. खालील कारणामुळे ते संभाव्य आहेत.

— आर्थिक अस्थिरता व अनिश्चितता ज्यामुळे गुंतवणूक व वाढ खुंटते.

— अकस्मिक नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती.

— गैर-तेजी उपाययोजना

— नाविण्याचा अभाव.